<u>गोरेगावात शिवसेनेतर्फे करिअर मार्गदर्शन शिबीर</u>

# आपला कल बघून विद्यार्थ्यांनी करिअर करावे : सुभाष देसाई

गोरेगाव शिवसेनेच्या वतीने दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना करिअरविषयक मार्गदर्शन करणारे शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबीरास ७०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग दिला. शिवसेना नेते व आमदार सुभाष देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या शिबीरास माजी सनदी अधिकारी व समाजसेवक अविनाश धर्माधिकारी यांनी मागदर्शन केले तसेच नुकत्याच झालेल्या आयएएस परिक्षेत महाराष्ट्रातून प्रथम आलेल्या अनिकेत मांडवगणे यांनीही उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दहावी व बारावीचे वर्ष हे विद्यार्थ्यांच्या करिअरच्या दृष्टीने महत्त्वाचे असून त्यातूनच त्यांची पुढील वाटचाल निश्चित होत असते. आई वडिल सांगतात किंवा मित्र सांगतो म्हणून नव्हे तर विद्यार्थ्यांनी आपली आवड व कल लक्षात घेऊन त्या क्षेत्रात करिअर केले पाहिजे तरच खऱ्या अर्थाने प्रगतीची व विकासाची उंची त्यांना गाठता येईल, असे विचार शिवसेना नेते व आमदार सुभाष देसाई यांनी यावेळी मार्गदर्शन करताना सांगितले.

स्पर्धात्मक परिक्षांचा विद्यार्थ्यांकडून बाऊ केला जातो. वास्तविक या परिक्षांसाठी योग्य नियोजन केले आणि अभ्यास केला तर निश्चितपणे यश मिळू शकते. त्यासाठी मानसिक व बौद्धिक तयारीदेखील महत्त्वाची असते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अशी मार्गदर्शन शिबीरे झाल्यास मराठी मुलांचे वर्चस्व सनदी सेवेत बघायला मिळेल, असे विचार अविनाश धर्माधिकारी यांनी व्यक्त केले.

अनिकेत मांडवगणे यांनी महाराष्ट्राची शान उंचावल्याबद्दल त्यांचा यावेळी शिवसेनेच्या वतीने सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक उपविभागप्रमुख अजय नाईक यांनी केले. महिला विभाग संघटक साधनाताई माने, प्रभाग समिती अध्यक्ष दिलीप शिंदे, नगरसेवक शांतू भोसले, शिवसेना व भारतीय विद्यार्थी सेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.